# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३५१-२२ दिनांक २३/११/२०२२

## मित्राची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करुन बिहार येथे पळुन जाण्याच्या तयारीत असतांना आरोपीस अटक-वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

वालीव पोलीस ठाण्याचे हद्दिमध्ये दिनांक २१/११/२०२२ रोजी दुपारी ०३:३० वा.चे पुर्वी भोयदापाडा ते वाघराळपाडा रोडवर वाघराळपाडा सनातन गोशाळेच्या पाठीमागील मोकळ्या गवताच्या जागेमध्ये इसम नामे कोंडीराम बाबु वाघमारे, वय ४८ वर्षे, रा. रुम नं १, राजवर्धन चाळ, पालनगर, वाघराळपाडा, नायगाव पुर्व, मुळ रा. पोस्ट काटगाव, टेलरनगर, उस्मनाबाद यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन पोटावर धारदार चाकुने वार करुन गंभीर स्वरुपाच्या दुखापती करुन जिवे ठार मारल्याबाबत वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. I १२११/२०२२ भा.द.वि.सं कलम ३०२ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीताचा शोध होणेकामी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांची पथके तयार करण्यात आली. सदर अज्ञात आरोपीत याचा शोध घेत असताना तंत्रिक विश्लेषन व गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्हयातील संशय इसम नामे सुजीत रामनारायण चौधरी, वय २६ वर्षे, रा. वाघराळपाडा, राजीवली वसई पुर्व ता. वसई जि.पालघर यास राजीवली, वाघराळपाडा या परिसरातुन ताब्यात घेवुन त्याच्याकडे गुन्हयाच्या अनुशंगाने कौशल्यपुर्ण चौकशी केली असता आरोपीत याने कबुली दिली की, घटनास्थळावर दोघांमध्ये किरकोळ वादातुन व शिवीगाळीतुन आरोपीत याने कोंडीराम वाघमारे याचा खुन केल्याची कबुली दिली. आरोपीत यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग तथा अतिरिक्त कार्यभार सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. मिलींद साबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पो.हवा महेश इंगळे, दिपक पाटील, मनोज मोरे, किरण म्हात्रे, नितीन ढवाण, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतिश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अंम- सचीन खताळ, सचीन मोहीते, जयवंत खांडवी, भरत राठोड यांनी पार पाडली आहे.




---ooo---